*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# जंजिरा संस्थानातील नवाब सर सिद्दी अहमदखान यांच्या कार्यकाळातील शैक्षणिक सुधारणा

**श्री. चंद्रकांत श्रीपती पाटील,** संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, chandrakant2434@gmail.com

---

## प्रस्तावना

जंजिरा संस्थान हे दक्षिणी संस्थाने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अठरा संस्थानांच्या गटातील एक महत्त्वाचे संस्थान होते. इ. स. १६२१ मध्ये निजामशहाकडून सिद्दी अंबर यांनी जंजिरा या प्रदेशाची कायमची जहागिरी मिळविली. आणि त्यानंतर ते या प्रदेशाचा स्वतंत्र कारभार पाहू लागले. सिद्दी अंबर यांना जंजिरा संस्थानाच्या हबशी राजवटीचे संस्थापक म्हणून ओळखले जाते.[१] इ. स. १६२१ ते १९४८ या कालावधीत "जंजिरा" संस्थानात एकूण वीस सत्ताधिशांनी साधारणपणे ३३० वर्षे राज्यकारभार केला. यापैकी सिद्दी अहमदखान (सन १८७९ ते १९२२) यांचे कार्यकाळात जंजिरा संस्थानात आधुनिकीकरणास सुरूवात झाली. शिक्षण, प्रशासन, दळणवळण आदि क्षेत्रात सुधारणा होऊ लागली होती. "शिक्षण" हे समाजसुधारणेचे महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचा एकंदरीत राज्याचा विकास साधता येतो यासाठी राज्यात शिक्षण प्रसार करणे आवश्यक आहे असे जाणणाऱ्या मध्ये जंजिराचे नवाब सर सिद्दी अहमदखान हे एक होते. प्रस्तुत शोधनिबंधात जंजिरा संस्थानात नवाब सर सिद्दी अहमदखान यांचे कार्यकाळात झालेल्या शिक्षण प्रसाराचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

## शैक्षणिक पार्श्वभूमी

ब्रिटीश अंमलापूर्वी जंजिरा संस्थानात जी शिक्षण व्यवस्था होती, ती धार्मिक व पारंपरिक शिक्षण देणारी व्यवस्था होती. यामध्ये विशेषत: शिक्षणाचा अधिकार समाजातील उच्च वर्ग व ब्राह्मण वर्गापुरता मर्यादित होता. त्यामुळे सर्वसामान्य बहुजन वर्ग हा शिक्षणापासून वंचित होता. ब्रिटीश अंमलानंतर इ. स. १८७० मध्ये जंजिरा संस्थानात प्रथमच ब्रिटीशांच्या मदतीने शिक्षण खाते स्थापन करून पहिली सरकारी शाळा स्थापन केली आणि आधुनिक शिक्षणास सुरूवात झाली. त्यानंतर काही प्रमुख गावा-गावात स्थानिक शाळा मध्ये काही मराठी शाळा व हिंदुस्थानी शाळांची स्थापना केली जात होती. मुरूड या राजधानीच्या ठिकाणी इंग्रजी शाळा स्थापन केली याचेच पुढे हायस्कूलमध्ये रूपांतर झाले. या शाळेबरोबर काही खाजगी शाळांना दरबाराकडून अनुदान देऊन या शाळांच्या माध्यमातून ज्ञानदानाचे कार्य चालत होते.[२]

## प्राथमिक शिक्षण

सन १८७९ मध्ये सिद्दी अहमदखान यांचे हाती राज्यकारभाराची सूत्रे आल्यानंतर जंजिरा संस्थानातील शिक्षण प्रसाराला अधिक गती प्राप्त झाली. इ. स. १८८८-८९ या अहवाल सालात जंजिरा संस्थानात प्राथमिक शिक्षण देणाऱ्या एकूण सरकारी शाळा ४१ इतक्या होत्या. त्यामध्ये मराठी शाळा १६ आणि विद्यार्थी संख्या ८१५ इतकी होती. यामध्ये मुलांना सातवी पर्यंत तर मुलींना तिसरी पर्यंत शिक्षण दिले जात होते. त्याशिवाय मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी हिंदुस्थानी शाळेतून उर्दू माध्यमातून शिक्षण दिले जात होते. हिंदुस्थानी पद्धतीच्या एकूण २३ शाळा आणि विद्यार्थी संख्या ९६१ इतकी होती. यामध्ये मुलांना पाचवी पर्यंत तर मुलींना तिसरी पर्यंत शिक्षण दिले जात होते. जंजिरा संस्थानात सर्व जातीधर्माचे लोक राहात होते. या सर्वांनाच शिक्षणाचा अधिकार होता. यामध्ये हिंदू, मुस्लिम, ज्यू आणि ख्रिश्चन धर्मातील विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत होते.[३]

नवाब साहेबांच्या उदार शैक्षणिक धोरणामुळे पुढील काळात प्राथमिक शाळांच्या संख्येत वाढ झाली. सन १८९२ मध्ये राज्यात सरकारी आणि खाजगी शाळांची संख्या ७२ आणि विद्यार्थी संख्या २६०० पर्यंत पोहचली होती. या शाळेंचा शैक्षणिक दर्जा वाढावा, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी नवाब साहेबांनी या शाळामध्ये प्रशिक्षित शिक्षक नेमणेस सुरूवात केली होती. त्याशिवाय मुरूड येथील मुलींच्या शाळेत एका प्रशिक्षित महिला शिक्षिकेची नेमणूक केली होती. त्यामुळे राज्यातील शिक्षणाचा दर्जा वाढून या शाळेतील मुले विविध परिक्षेत

यशस्वी होत होती. या संदर्भात कुलाबा जिल्ह्याचे सहाय्यक उपशिक्षण निरिक्षक यांनी या शाळेंना भेटी देऊन शाळांच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले होते.[४]

**प्राथमिक शिक्षणाची मोफत सुविधा**

जंजिरा संस्थानचे नवाब सर सिद्दी अहमदखान हे एक सुधारणावादी विचारसरणीचे सत्ताधिश होते. समाजसुधारणेसाठी शिक्षणाची किती आवश्यकता आहे याची जाणीव त्यांना होती त्यामुळे आपल्या संस्थानातील सर्वसामान्य गरीब जनतेला मोफत शिक्षण मिळाले तरच त्यांच्यात सुधारणा होईल म्हणूनच त्यांनी सन १९०७ मध्ये जंजिरा संस्थानातील सर्व वर्गातील आपल्या प्रजाजनासाठी मोफत प्राथमिक शिक्षण देण्याचा ठराव करून त्यानुसार राज्यातील सर्व प्रजाजनांना इयत्ता तिसरी पर्यंत सर्वांना मोफत शिक्षण सुरू झाले होते. ही जंजिरा संस्थानच्या इतिहासातील एक संस्मरणीय अशी घटना होती. या योजनेच्या माध्यमातून संस्थानातील सर्व खेडयापाडयात शिक्षणाचा प्रसार करणेसाठी, विद्यार्थी व पालक यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगणेसाठी नवाब साहेबांनी आपली सर्व सरकारी यंत्रणा कामाला लावली होती.[५] याप्रसंगी दक्षिणी विभागाचे शैक्षणिक निरिक्षण यांनी जंजिरा संस्थानातील काही शाळांना भेटी देऊन संस्थानातील शिक्षण प्रसाराच्या कार्याबद्दल श्रीमंत नवाबसाहेब व त्यांच्या सहकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या होत्या. याप्रसंगी त्यांनी आपले खालीलप्रमाणे मत मांडले होते.

In his letter to you forwarding his remarks on the inspections of the primary schools he says, “I feel happy to note that his highness The Nawab Saheb takes great interest in the education of his subjects and the State Karbhari is helpful…The State is doing what it can for the spread of Primary Education Schools are well supervised by the State Inspector Mr. Saifuddin Daud, an energetic and capable young man. He is himself a trained teacher and holds a third year certificate of the Poona Training College.”[6]

नवाब सिद्दी अहमदखान यांनी संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत केल्यामुळे पुढील काळात सन १९२१ अखेर संस्थानात एकूण ३२१४ मुले प्राथिमक शिक्षण घेत होती. पुढे मे १९२२ मध्ये त्यांचा मृत्यू झाल्यामुळे राज्याच्या शिक्षण प्रसार कार्यात थोडी फार शिथिलता आली होती.[७]

**अंजूमन-ए-इस्लाम**

मुस्लिम समाजाची शैक्षणिक प्रगती व्हावी त्यांच्यात सुधारणा व्हावी या उद्देशाने सन १९०७ मध्ये श्री. सय्यद कादरी यांनी नवाब साहेबांच्या मदतीने अंजूमन-ए-इस्लाम या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून हिंदुस्थानी शाळेत किंवा मराठी-इंग्रजी शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुस्लिम विद्यार्थ्यास शिक्षणाच्या सर्व सुविधा पुरविल्या जात होत्या. सन १९०७-०८ या वर्षात या संस्थेच्या माध्यमातून एकूण सतरा मुस्लिम विद्यार्थ्यांची राहणे व जेवणाची व्यवस्था केली होती. त्याचबरोबर मुस्लिम समाजातील गरीब विद्यार्थ्यांना पाटी पेन्सिल व पुस्तकांचे मोफत वाटप केले जात होते.[८] या संस्थेसाठी नवाब साहेबांनी एका सुसज्ज इमारतीसह जागा बक्षिस म्हणून दिली होती. या संस्थेस नवाब साहेबांचा राजाश्रय मिळाल्यामुळे उत्तरोत्तर या संस्थेची प्रगती होत गेली.[९]

**माध्यमिक व हायस्कूल शिक्षण**

जंजिरा संस्थानातील विद्यार्थ्यांना इंग्रजी पद्धतीचे माध्यिमक शिक्षण देणारी एक इंग्रजी शाळा अस्तित्त्वात होती. या शाळेच्या सर्वांगिण प्रगतीसाठी नवाब सर सिद्दी अहमदखान यांनी विशेष प्रयत्न केले होते. सन १८९२ मध्ये या शाळेत फक्त ६८ विद्यार्थी शिकत होते. पुढील काळात नवाब साहेबांच्या विशेष प्रयत्नातून इंग्रजी शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना आवड निर्माण व्हावी, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी इंग्रजी शिक्षणाचा लाभ घ्यावा या उद्देशाने विविध उपाययोजना केल्या होत्या.[१०] या शाळेच्या दर्जात व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी या उद्देशाने प्रशिक्षित शिक्षकांची नेमणुक विविध शालोपयोगी उपकरणे व साहित्य यांची सोय दरबाराकडून केली जात होती. आपल्या संस्थानातील विद्यार्थ्यांची पुढील म्हणजे मॅट्रिकपर्यंत शिक्षणाची सोय संस्थानातच व्हावी म्हणून श्रीमंत नवाबसाहेबांनी सन १८९७-९८ मध्ये या इंग्रजी शाळेत मॅट्रिकपर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली होती. या शिक्षणाचे शुल्क नाममात्र स्वरूपात आकारले जात होते. त्यामुळे जंजिरा संस्थानाबरोबर इतर शेजारच्या

राज्यातील ही विद्यार्थ्यांना या शाळेचा मोठया प्रमाणात फायदा झाला होता.[११] अशा प्रकारे जंजिरा संस्थानात सर सिद्दी अहमदखान यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन संस्थानातील समस्त जनता व दरबारी मंडळी यांनी इ. स. १९०० मध्ये या इंग्रजी शाळेचे नाव 'सर सिद्दी अहमदखान हायस्कूल' (सर एस. ए. हायस्कूल) असे ठेवण्यात आले.[१२]

या काळात जंजिरा संस्थानात मॅट्रिकपर्यंत शिक्षण देणारी ही एकमेव शाळा होती. या शाळेत नियिमत अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक व नैतिक विकासासाठी विविध शालेय उपक्रम घेतले जात होते. सर एस. ए. हायस्कूलमध्ये नवाब साहेबांचे विशेष लक्ष आणि प्रशासनाचे योग्य व्यवस्थापन यामुळे पुढील काळात या संस्थेची प्रगती वाढतच चालली होती. सन १९२०-२१ अखेर या हायस्कूलमध्ये जवळजवळ २०० विद्यार्थी शिकत होते.

नवाब साहेबांच्या उदार शैक्षणिक धोरणामुळे राज्यातील उच्च व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात होती. सन १८९९ मध्ये मॅट्रिक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांला पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली गेली होती. शिवाय त्याच वर्षी पुणे येथील ट्रेनिंग कॉलेजमध्ये तीन विद्यार्थी व मेडीकल कॉलेज मुंबई येथे दोन विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी पाठविले होते. त्यांचा सर्व खर्च संस्थानामार्फत केला गेला होता.[१३]

**समारोप**

स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या देशातील, आपल्या समाजातील लोकांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी काही समाजसुधारकांनी व काही संस्थानिकांनी आपल्या प्रजेला शिक्षण देण्याचे कार्य हाती घेतले होते. त्यामध्ये जंजिरा संस्थानचे नवाब सर सिद्दी अहमदखान यांचे ही नाव घेतले जाते. सर सिद्दी अहमदखान यांचे हाती संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती आल्यानंतर त्यांनी सर्व खेडयापाडयात शाळा स्थापन करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य केले. त्यासाठी त्यांनी सर्वसामान्य जनतेला प्राथमिक शिक्षण सहज घेता यावे यासाठी मोफत केले. त्याचबरोबर संस्थानातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेता यावे यासाठी हायस्कूलमध्ये मॅट्रिकपर्यंत शिक्षण देणेची सुविधा उपलब्ध केली. संस्थानातील ज्या काही गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना पुढील उच्च व व्यावसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्तीच्या स्वरूपात आर्थिक मदत केली जात होती. अशा प्रकारे थोडया फार प्रमाणात दुर्लक्षित राहिलेले जंजिराचे नवाब सर सिद्दी अहमदखान यांचे शैक्षणिक कार्य थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ**

१. घाणेकर प्र. के., 'जंजिरा', स्नेहल प्रकाशन पुणे, १९९९, पृ. २६.

२. Gazetter of the Bombay Presidency Kolaba District, Government Printing Press, 1893, Page No. 458.

३. जंजिरा संस्थानचा प्रशासकीय अहवाल, सन १८८८-८९, पृ. २४-२५.

४. जंजिरा संस्थानचा प्रशासकीय अहवाल, सन १८९१-९२, पृ. ३०.

५. जंजिरा संस्थानचा प्रशासकीय अहवाल, सन १९०६-०७, पृ. २६.

६. जंजिरा संस्थानचा प्रशासकीय अहवाल, सन १९०६-०७, पृ. २६.

७. जंजिरा संस्थानचा प्रशासकीय अहवाल, सन १९२०-२१, पृ. ३१.

८. जंजिरा संस्थानचा प्रशासकीय अहवाल, सन १९०७-०८, पृ. २९.

९. जंजिरा संस्थानचा प्रशासकीय अहवाल, सन १९२४-२५, पृ. ३६.

१०. जंजिरा संस्थानचा प्रशासकीय अहवाल, सन १८९२-९३, पृ. ३९.

११. जंजिरा संस्थानचा प्रशासकीय अहवाल, १८९७-९८, पृ. ४३.

१२. चिटणीस शरद, जंजिरा संस्थानचा इतिहास, मुंबई प्रकाशन, इतिहास संशोधन मंडळ, १९९९, पृ. ५९.

१३. जंजिरा संस्थानचा प्रशासकीय अहवाल, सन १८९९-१९००, पृ. ४१.